# महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित

**महावितरण कंपनीमधील अनुक्रमे उपकेंद्र सहाय्यक, पदविकाधारक शिकाऊ अभियंता (वितरण)/(स्थापत्य) व पदवीधारक शिकाऊ अभियंता (स्थापत्य) या पदाकरीता जाहिरात क्र. ०५/२०१९, ०६/२०१९ व ०१/२०१९ (अंतर्गत अधिसूचना) नुसार निवड व प्रतिक्षा यादीमधील उमेदवारांच्या माहितीकरीता.**

- यापूर्वी नमूद केल्याप्रमाणे, वरील पदांच्या भरती प्रक्रिया पूर्ण करणे हा आमचा सक्रीय विचार होता. निवड व प्रतिक्षा यादीमधील उमेदवारांच्या आकांक्षांचा विचार करुन आणि या उमेदवारांच्या भरतीमुळे ग्राहक सेवेमध्ये सुधारणा होणार असल्यामुळे या दोन पदांच्या भरती प्रक्रियेचे उर्वरीत टप्पे पूर्ण करण्याचे ठरविण्यात आले आहे.

- तथापि, सदरची भरती प्रक्रिया ही मा. सर्वोच्च न्यायालयाच्या दि. ०९/०९/२०२० च्या आदेशाच्या अधीन असेल. मा. सर्वोच्च न्यायालयाच्या दि. ०९/०९/२०२० च्या आदेशास अधीन राहून सर्व प्रवर्गातील उमेदवारांना, सामाजिक आणि शैक्षणिक मागास प्रवर्ग (एस.ई.बी.सी.) वगळून नियुक्ती आदेश (जाहिरात क्र. ०६/२०१९ व ०१/२०१९) देण्यात येतील व अशा उमेदवारांची (जाहिरात क्र. ०५/२०१९) कागदपत्रांची पडताळणी करण्यात येईल.

- वरील तिनही पदाकरीतांची सामाजिक आणि शैक्षणिक मागास प्रवर्गाची (एस.ई.बी.सी.) निवड व प्रतिक्षा यादी वैध राहील. सदरची रिक्त पदे भरण्यात येणार नसून ती बाजूला ठेवली जातील. सदरची निवड व प्रतिक्षा यादी मा. सर्वोच्च न्यायालयाच्या अंतिम आदेशानुसार कार्यान्वीत केली जाईल.

- अद्याप "विद्युत सहाय्यक" या पदाकरीता निवड/प्रतिक्षा यादी प्रसिध्द केलेली नसल्यामुळे सदर पदाची भरती प्रक्रिया ही मा. सर्वोच्च न्यायालयाचे या प्रकरणातील अंतिम आदेशानंतरच प्रारंभ केली जाईल.

- "उपकेंद्र सहाय्यक" पदाकरीता निवड झालेल्या उमेदवारांची कागदपत्र पडताळणी दि. ०१-०२/१२/२०२० रोजी विविध मंडल कार्यालयामध्ये करण्यात येईल. ज्या मंडल कार्यालयामध्ये कागदपत्र पडताळणीकरीता उमेदवाराने हजर रहायचे आहे हे उमेदवारांना ह्या वेबसाईटवर (website) व योग्य वेळी कळविण्यात येईल. जे उमेदवार त्यांच्या कागदपत्रांची पडताळणी व वैद्यकीय तपासणी/चाचणी यशस्वीरित्या पार पाडतील अशा सर्व उमेदवारांना कागदपत्र पडताळणीनंतर सक्षम अधिकारी यांचेकडून नियुक्ती आदेश देण्यात येतील.

*****